दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २५३ | MAHMAR/2006/17212 | रायगड | गुरुवार, दि.११ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### वडाळे तलावासह व्हि.के.हायस्कूल परिसरात...

# हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांविरोधात पनवेल शहर पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल ।** शहरातील वडाळे तलावासह व्हि.के.हायस्कुल परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांविरोधात आज पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने धडक कारवाई केली आहे.

वडाळे तलावासह व्हि.के.हायस्कुल परिसरात अनेक तरुण दुचाकी, चार चाकी वाहने घेऊन हुल्लडबाजी करित असतात. याचा नाहक त्रास या भागातील शालेय विद्यार्थांसह परिसरातील नागरिकांना होत होता.

याबाबत अनेक तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्याकडे विविध राजकीय पक्ष तसेच सामाजिक संघटना यांनी केल्या होत्या.

या तक्रारीच्या आधारे आज वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह पो.नि. अभंग व



विशेष पथकाने आज या भागात धडक कारवाई करत ल्लडबाजी करणाऱ्या तरुणांना चांगलाच धडा शिकविला. त्यामुळे त्यांची चांगलीच पळती भुई झाली.

या कारवाईचे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून या पुढे सुद्धा अश्या प्रकारे कारवाई सुरूच ठेवण्यात येईल अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिली.

### पनवेल महानगरपालिकेला 'माझी वसुंधरा अभियान ३.०' अंतर्गत मिळालेल्या राज्यस्तरीय पारितोषिकातून सौर-ट्री प्रकल्पांना गती

# शहरातील ५ उद्यानांमध्ये सोलार ट्रींची उभारणी पूर्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेला 'माझी वसुंधरा अभियान ३.०' अंतर्गत राज्यस्तरीय तृतीय क्रमांक मिळाल्यानंतर प्राप्त झालेल्या बक्षीस रक्कमेतून शहरातील विविध प्रभागांमधील पाच उद्यानांमध्ये नाविन्यपुर्ण अशा 'सोलार ट्री' उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या पर्यावरणपूरक उपक्रमांपैकी हा एक महत्त्वाचा प्रकल्प असून, ऊर्जा बचत, स्वच्छ ऊर्जा निर्मिती आणि पर्यावरण जनजागृती यांना मोठा हातभार लागणार आहे.

डीपीआर मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या कामाअंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खालील ५ ठिकाणी सौर-ट्रींची स्थापना करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे सौर ऊर्जा वापराला प्रोत्साहन मिळणार असून, नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक संदेशही पोहोचणार आहे. पुढील काळात अशाच आणखी पर्यावरणपूरक प्रकल्पांना गती देण्याचा मानस उपायुक्त स्वरुप खारगे यांनी व्यक्त केला आहे.

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पनवेल महानगरपालिकेने प्रभावी पावले उचलली आहेत. यामध्ये धूळ नियंत्रण, हवेची गुणवत्ता तपासणी आणि शुद्धीकरणासाठी अत्याधुनिक साधनांचा वापर करून शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नागरिकांना स्वच्छ हवा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक प्रभावी उपाययोजना हाती घेतल्या आहेत. यामध्ये ४ फॉग कॅनन वाहने, याशिवाय, एअर मॉनिटरिंग व्हॅन च्या माध्यमातून शहरातील विविध भागांतील हवेची गुणवत्ता नियमितपणे मोजली जाते. शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी ५ एअर प्युरिफिकेशन सिस्टीम्स बसविण्यात आलेल्या असून लवकरच अजून ५ ठिकाणी या सिस्टीम बसविण्यात येणार आहे.

# दिबांच्या विमानतळ नामकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक

### मुख्यमंत्री लवकरच प्रेस स्टेटमेंट देणार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या विमान उड्डाणापूर्वी दिबासाहेबांचे नाव दिले जावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज्याचे वने मंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आज नागपूर येथे चर्चा भेट घेतली. लोकनेते दि. बा. पाटील विमानतळ नामकरणाच्या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण सकारात्मक असल्याचे आणि या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याला आश्वस्थ केले आहे असे सांगितले असून मुख्यमंत्री महोदय लवकरच प्रेस स्टेटमेंट देणार असल्याची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसार माध्यमांना दिली. यावेळी त्यांच्यासमवेत लोकनेते दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार किसन कथोरे, आमदार महेश बालदी, तसेच समितीचे सदस्य उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळाच्यावतीने बोलताना सांगितले कि, लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येत्या २५ तारखेला खुला होणार आहे. तो खुला होण्याच्या आधी राज्य सरकारने या विमानतळाला घोषित केलेले लोकनेते दि. बा. पाटील हे नामकरण किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषे-तील दिबांच्या नावाचा नामविस्तार व्हावे या दृष्टिकोनातून आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेतली. आणि विमानतळावर पहिले उड्डाण होण्याआधी या विमानतळाचे दिबासाहेबांच्या नावाने नामकरण झाले पाहिजे यासाठी प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमध्ये मागणी व अस्वस्था आहे आणि ठिकठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीच्या आंदोलनांची घोषणा होत आहे. अशावेळेला या विमानतळाला दिबासाहेबांचे नाव पहिले उड्डाण होण्यापूर्वी लागले पाहिजे हि प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांची तळमळ आहे. लोकनेते दि. बा. पाटील यांचे विमानतळाला लावण्यासाठी झालेल्या अनेक मोर्चे, आंदोलन संघर्षात आम्हा सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे सांगून सगळ्यात जास्त तळमळ आमच्यामध्ये प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमध्ये असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसार माध्यमात नमूद केले. त्यामुळे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आम्ही सर्वानी भेट घेत उड्डाणापूर्वी दिबासाहेबांच्या नावाने विमानतळाचे नामकरण झाले पाहिजे अशी पुनर्मागणी केली. नेमके त्याच्या आधी होईल का सांगता येणार नाही. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आश्वस्थ केले आहे त्यामुळे विमानतळाला दि. बा पाटील साहेबांचे नाव लागणारच असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. या यासंदर्भात त्यांनी प्रेस स्टेटमेंट द्यावे अशी आमच्या शिष्टमंडळाने विनंती केली, त्यावर त्यांनी या संदर्भामध्ये लवकरच यथायोग्य प्रेस स्टेटमेंट देणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे लवकरच मुख्यमंत्री महोदय आपली प्रेस स्टेटमेंट देऊन प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमधील संदिग्धता मिटवतील अशी अपेक्षा आहे. आणि प्रत्यक्ष ज्या वेळेला दिबासाहेबांच्या नावाचे नामकरण होईल त्या वेळेला विजयी उत्सव आम्ही साजरा करू असेही यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले.

विरोधकांच्या वक्तव्यावर विचारलेल्या पत्रकारांच्या प्रश्नावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले कि, खरं तर ज्या प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी आंदोलनात भाग घेतला त्यांना या संदर्भात जाब विचारण्याचा अधिकार आहे. पण ज्यांनी दि. बा. पाटील साहेबांचे नावही घेतले नाही कारण त्यांना त्यावेळी दिबासाहेबांच्या नावाची काविळ होती आणि राजकारणात तर फार आधीपासून असताना यापूर्वी झालेल्या आंदोलनात ते कुठेही दिसले नाहीत, उलट हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले जावे याच्यापुढे ते शब्दही काढत नव्हते अशांना तर आम्हाला कुठलाही प्रश्न विचारायचा अधिकार नाही, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोखठोकपणे स्पष्ट केले. ज्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आम्हाला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा शब्द आहे सांगतात आणि तसे आश्वस्थ करतात तो आमच्यासाठी अंतिम आहे. पंतप्रधांनांना या संदर्भात भेटणार का असा पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देताना आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत त्यांच्या नेतृत्वाखाली जे काही प्रयत्न करायचे आहेत ते सर्व प्रयत्न करू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळाच्या वतीने स्पष्ट केले.

# चोरी, गहाळ झालेले ४२ मोबाईल पोलिसांनी दिले त्यांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** चार वर्षात कर्जत पोलीस स्टेशन हद्दीतून चोरी, गहाळ झालेले ४२ मोबाईल पोलिसांनी इतर राज्यातून कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतले व त्या मालकांना ते परत दिले आहेत सुमारे १४ लाख २७ हजार रुपयाचे किंमतीचे मोबाईल त्यांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील सन २०२१,२०२३,२०२४ आणि २०२५ या वर्षा चार मध्ये चोरी, गहाळ झालेले मोबाईल सी ई आय आर पोर्टल द्वारे महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, छत्तीसगड, तसेच बिहार राज्यातून कर्जत पोलिसांनी शोध घेऊन ताब्यात घेतले असून ४२ मोबाईल १४ लाख २७ हजार किंमतीचे मोबाईल आज दि. १० डिसेंबर रोजी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या हस्ते परत करण्यात आले, याप्रसंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, पोलिस उपनिरीक्षक सुशांत वरक, पोलीस हवालदार स्वप्निल येरुणकर, पोलीस हवालदार समीर भोईर, पोलीस नाईक केशव नागरगोजे, पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल गावस उपस्थित होते. आज दि.१० डिसेंबर रोजी २८ मोबाईल तक्रारदार यांना परत केले असून १४ तक्रारदार हजर नसल्याने तक्रारदार येताच त्यांना मोबाईल परत करण्यात येतील अशी माहिती पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनी दिली.




### शासकीय तिजोरीत खडखडाट ;१८३ कोटींच्या निधी उपलब्ध करून देण्यात दिरंगाई

# करंजा मच्छीमार बंदर गाळाने भरल्याने ३०० बोटी पुन्हा गाळात रुतल्या

### मच्छीमार बोटींना बंदरात ये-जा करण्यासाठी चार- चार तासांची प्रतिक्षा ; मासळी व्यावसायिक संकटात

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण ।** तिजोरीत खडखडाट असलेल्या राज्य शासनाकडे करंजा मच्छीमार बंदराचा गाळ काढण्याचा व इतर तत्सम कामांचा १८३ कोटी खर्चाचा प्रस्ताव मागील एक वर्षापासून धुळ खात पडून आहे.यामुळे या मात्र बंदरातील गाळाच्या समस्येमुळे मच्छीमार पुरते हवालदिल झाले असुन करंजा मच्छीमार बंदरात मागील ६ दिवसांपासून ३०० मच्छीमार बोटी पुन्हा गाळात रुतून बसलेल्या आहेत.यामुळे मच्छीमारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.रायगड जिल्ह्यातील हजारो मच्छीमारांसाठी २५६ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले करंजा मच्छीमार बंदर मागील वर्षभरापासून गाळाने भरण्यास सुरुवात झाली आहे.





गाळाच्या समस्येमुळे हजारो मच्छीमारांना ओहोटीच्या वेळी बंदरात मासळी उतरविण्यासाठी येणाऱ्या मच्छीमारांना आणि बंदरातुन मासळी उतरवून पुन्हा बाहेर जाण्यासाठी बंदरात बाहेरच चार- चार तास समुद्रातच वाट पाहावी लागते. यामुळे बंदरात आणि बंदराबाहेर शेकडो बोटी गाळात अडकून पडतात. बंदरात आणि बंदराबाहेर सुमारे २५० ते ३०० बोटी अडकून पडलेल्या आहेत.या गाळाच्या समस्येमुळे मासळी व्यावसायिक संकटात सापडले आहेत. सुमारे १३ वर्षाच्या दिर्घ प्रतिक्षेनंतर सात- आठ महिन्यांपूर्वी २५६ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले करंजा मच्छीमार बंदर अखेर कार्यान्वित झाले आहे.त्यामुळे या करंजा मच्छीमार बंदरातुन आता सुमारे ५०० कोटींची मासळी निर्यात होऊ लागली आहे.

याआधीच या मच्छीमार बंदराची उंची कमी असल्याने मच्छीमार बोटी क्षतीग्रस्त होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.त्याशिवाय अनेक पायाभूत समस्याही भेडसावित आहेत.त्यामध्ये आता नव्याने बंदरात मोठ्या प्रमाणावर साचत चाललेल्या गाळाची समस्येची भर पडली आहे.गाळाच्या समस्येमुळे उधाणाच्या ओहोटीच्या काळात मच्छीमार बोटींना बंदरात येण्यासाठी चार -चार तासांची प्रतिक्षा करावी लागते.यामुळे मासेमारी करून येणाऱ्या मच्छीमार बोटींना धड बंदरातही येता येत नाही आणि मासळी उतरवून झालेल्या बोटींना बंदरातुन बाहेर पडणेही शक्य होत नाही.यामुळे मच्छीमारांचा नाहक वेळेचा अपव्यय होत असल्याने आर्थिक नुकसानालाही सामोरे जावे लागत आहे.बंदराच्या समस्यांची संबंधित विभागाचे अधिकारी राजेश अग्रवाल यांनी पाहाणीही केली आहे.

मात्र त्यानंतरही कोणतीही कार्यवाही झाली नाही.तसेच वादळी वारा, पाऊस व लाटांपासुन संरक्षणासाठी उभारण्यात आलेली संरक्षक भिंत निरुपयोगी ठरत आहे.मात्र उभी भिंत उभारण्यात आल्यास बोटींसाठी आणखी अधिक जागा उपलब्ध होईल.त्याचा फायदा सर्वच मच्छीमारांना होईल. अशी मागणी वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट फिशरमेन वेल्फेअर असोसिएशनचे संचालक रमेश नाखवा यांनी केली आहे.तर करंजा मच्छीमार बंदरातील गाळ काढणे व इतर काही पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १८३ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.मात्र कामासाठी वेळेत निधी उपलब्ध होऊ शकलेला नाही.यामुळे बंदरातील गाळ व पायाभूत सोयीसुविधांचे काम रखडले आहे.मात्र यामुळे मात्र मच्छीमारांची गैरसोय होत असुन अनेक समस्यांचाही सामना करावा लागत आहे.अशी माहिती करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी दिली.

# रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये वक्तृत्वाचा जल्लोष; कोपरा, मुर्बी व खारघर येथील उत्कृष्ट २४ विद्यार्थ्यांचा गौरव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत रायगड जिल्हा परिषद शाळांच्या आंतरशालेय पारितोषिक वितरण सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोपरा, मुर्बी आणि खारघर येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या जोमाने सहभाग घेतला. विविध फेऱ्यांमध्ये प्रभावी कामगिरी सादर करत एकूण २४ विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावले, तसेच या प्रतिभावान विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व, माझे स्वप्न, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त भारत, डिजिटल युगातील विद्यार्थी, जर मी नेता असतो अशा विषयांवर प्रभावी, स्पष्ट आणि आत्मविश्वासपूर्ण मांडणी करून प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या विचारांची खोली व भाषणकलेची रचना पाहून उपस्थितांनी भरभरून दाद दिली. सोहळ्याला विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी वक्तृत्वाच्या व्यासपीठावर मिळवलेले हे यश सर्वांसाठी अभिमानाचे ठरले.

स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले कि, कोपरा, मुर्बी आणि खारघर येथील रा. जि. प. शाळांमधील विद्यार्थ्यांची कामगिरी प्रेरणादायी आहे. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील मुलांना आत्मविश्वास वाढवण्यास आणि स्वतःला सिद्ध करण्यासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध होते.तर मुख्याध्यापिका अनिता शेळके यांनी स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित करताना नमूद केले. आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची भाषणकला, नेतृत्वगुण आणि विचारशक्ती विकसित होते. कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिकेच्या पुढाकारामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळाली आहे.

या उपक्रमामुळे रायगड जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढला असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा खारघर महासचिव दीपक शिंदे, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, उत्तर रायगड सचिव ब्रिजेश पटेल, खारघर उपाध्यक्ष किरण पाटील, अजित अडसुळे, सुरेश ठाकूर, दत्ता ठाकूर, अजय माळी, अश्विनी भुवड, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हाटगे, योगेश पाटील, मयूर घरत, यश पवार, अनिकेत पाटील, बंटी ढाकसे आदी उपस्थित होते.

# २८ वर्षीय तरुण बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आळंदी येथे पायी दर्शनाला जातो असे सांगून वलप येथील राहत्या घरातून २८ वर्षीय तरुण निघून गेला आणि तो परत आला नाही. त्यामुळे तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.

परेश त्रिंबक टेंभे हा साई मंदिराजवळ वलप,पनवेल येथे राहत असून त्याची उंची पाच फूट सहा इंच आहे. तो रंगाने गोरा असून दाढी मिशी वाढलेली आहे. त्याच्या उजव्या हाताचा कोपरा ते मनगटापर्यंत गोंदवलेले आहे.

त्याला आगरी आणि मराठी भाषा बोलता येते. त्याला ऐकू कमी येते. त्याने अंगात पांढऱ्या रंगाचे टी-शर्ट आणि राखाडी रंगाची जीन्स पॅन्ट घातली आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार संजय दोरगे यांच्याशी संपर्क साधावा.

# कोण ठरणार नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीचा वाली ?

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान ।** माथेरान नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अत्यंत चुरशीची लढाई झाली असून २१ डिसेंबर रोजी मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागात काटे की टक्कर पहावयास मिळणार असून थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत काही ठिकाणी उमेदवारांना मते मिळणार आहेत त्यातही आपल्या आवडीच्या नेत्याला अर्थातच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला पसंती दिली जाणार आहे.

शिवसेना- भाजप युती कडून चंद्रकांत चौधरी तर राष्ट्रवादी काँग्रेस, उबाठा गटाच्या शिवराष्ट्र पॅनेल कडून माजी नगराध्यक्ष अजय सावंत हे थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी दुहेरी लढत झाली.

माथेरानच्या राजकीय इतिहासात प्रथमच याठिकाणी राज्यातील मंत्री महोदय त्याचप्रमाणे तालुक्यातील नेत्यांनी ही निवडणूक आपापल्या प्रतिष्ठेचा विषय बनविल्यामुळे प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जोमाने कामे केलेली आहेत. कधी नव्हे एवढा घोडेबाजार झाल्याने एकप्रकारे मतदारांनी दिवाळी साजरी केली आहे.

दोन्हीही बाजूंनी मतांचा मोबदला प्राप्त झाल्याने यावेळी मतदारांनी सुध्दा कुणा एका उमेदवाराच्या पारड्यात मते न टाकता समसमान मते विभागून दिल्याची चर्चा सुरू असल्यामुळे ठामपणे आपलाच उमेदवार अथवा नेता नगराध्यक्ष पदावर विराजमान होईल हे सांगणे कठीण बनले आहे.

केवळ पाच टक्के सुज्ञ मतदार वगळता उर्वरित सर्वांनी हा लोकशाहीचा उत्सव भविष्यातील विकास बाजूला ठेवून स्वतःच्या फायद्याच्या दृष्टिकोनातून आनंदाने साजरा केला.त्यामुळे काही दिवसांनी प्रत्येक उमेदवारांचे भाग्य ज्या मतपेटीत बंदिस्त आहे ते लवकरच उघड होणार असून नगरपरिषदेच्या सत्तेत आणि नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीचा वाली कोण हे अधोरेखित होणार आहे. तोपर्यंत या रिकाम्या वेळेत बहुतांश उमेदवार आपल्या पारड्यात किती मते मिळणार याचाही अंदाज बांधून पुढील तयारी करण्यात मग्न दिसत आहेत.

## जाहीर नोटीस

**मूखत्यारपत्र व भूखंड विकासाचा करारनामा रदद् केल्या बाबतची जाहिर नोटीस**

अशी जाहिर नोटिस देण्यात येते की, श्री. दिलीप बाळाजी पाटील. मु. नरदास चाळ पेण ता. पेण जि रायगड व श्री. जितेंद्र तुळशिदास म्हात्रे, मु. वढाव, ता. पेण, जि- रायगडयांनी मे. गुरुदत्त रियालिटी तर्फे प्रो.प्रा.श्रीमती, गुरमितकौर मुकेश सकला धंदा बिल्डर मु. प्लॉट नंबर ५०२, बिल्डींग नंबर १०. श्री शास्वत कॉप्लेक्स, प्लॉसेटा पार्क मिरा रोड, मुंबई ४०११०७, यांना आमचे अशिलाचे मालकिची व ताबेकब्जाची गाव पेण, ता. पेण. जि- रायगड येथिल सर्व्हे नंबर ३७९, अ, हिस्सा नंबर २, एकूण क्षेत्र०.०५.३, हे. आर. चौरस मिटर आकार १. १२, पैसे. हि बिनशेती मिळकत विकसित करण्यासाठी व त्या मिळकतीवर निवासी गाळे व व्यापारी गाळे बांधण्यासाठी दि. ०७/०१/२०२१ रोजी कधिही रदद् न होणारे रजिस्टर मूखत्यारपत्र लिहुन दिले होते. तसेच दि. ०७/०१/२०२१ रोजी रजिस्टर भूखंड विकासाचा करारनामा पेण रजिस्टर कार्यालयात केलेला आहे. तो पेण येथिल रजिस्टर कार्यालयात रदद् पत्राने रदद् केला आहे. असे कळविले आहे. तसेंच सदरचे दोनही करार गुरुदत्त रियालिटी तर्फे प्रो.प्रा.श्रीमती, गुरमितकौर मुकेश सकला यांनाही रदद् केल्याचे ता. ८/९/२०२५, रोजी व्हाटसअप ने कलविली आहे व तो त्याने पाहिली आहे. तर रजिस्टर नोटीस त्यांने स्विकारली नाही.

तरी हि जाहिर नोटीस देण्यात येते की, आमच्या अशिलांच्या मालकिची पेण येथिल सर्व्हे नंबर ३७९, अ, हिस्सा नंबर २, एकूण क्षेत्र०.०५.३, हे. आर. चौरस मिटर आकार १.१२, पैसे. हि बिनशेती मिळकतीचे बाबत यापूर्वी कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला असेल, तर त्यांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पूराव्यानिशी हरकत घेणेची आहे.

तसेच ही नोटिस प्रसिध्द केल्यापासून वर उल्लेख केलेल्या मिळकतीच्या बाबत जर कोणी कोणताहि व्यवहार गुरुदत्त रियालिटी तर्फे प्रो.प्रा. श्रीमती, गुरमितकौर मुकेश सकला. यांचे मार्फत ठरविला व केला तर सदर व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. व तो व्यवहार बेकायदेशिर ठरेल याची नोंद घ्यावी. सदरचे दोनही करार हे आज ता. ११/१२/२०२५ रोजी रदद केले आहेत. असे समजण्यात यावे.

पेण
दि.११/१२/२०२५

सही/-
**श्री. दिलीप बाळाजी पाटील**
**मु. नरदास चाळ पेण ता. पेण जि- रायगड**
**९२७०२९२६६५**
**श्री. जितेंद्र तुळशिदास म्हात्रे**
**मु. वढाव, ता. पेण, जि- रायगड**
**८००७९६७७८८**

## पनवेल महानगरपालिका
### पर्यावरण विभाग

पनवेल महानगरपालिकेमार्फत नोंदणीकृत व अनुभव संस्थांकडून माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना विविध माध्यमांद्वारे पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञा (E-Pledge) घेण्यासाठी प्रोत्साहित करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेकरिता जाहीर सूचनेद्वारे दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा.क्र/प.महा/पर्या./३९२५/प्र.क्र. १९/३३८/२०२५
दिनांक : १०/१२/२०२५

**(सही/-)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

# संजय गुंजाळ यांना कोकणरत्न पुरस्कार जाहीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोकण मराठी साहित्य परिषदेचे रायगड जिल्हा अध्यक्ष,प्रियदर्शनी फाऊंडेशनतर्फे पंडित नेहरू समाजरत्न पुरस्कार प्राप्त मुरुड नगरपरिषदेचे माजी नगरसेवक खासदार सुनील तटकरे यांचे कट्टर समर्थक संजय पांडुरंग गुंजाळ यांना रायगड सांस्कृतिक कला मंडळ, महाराष्ट्र राज्य रजि.चा कोकण रत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्याचे विद्यमान मालक श्री. नामदेव जोमा नारंगीकर यांच्याकडून आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याबाबतचा व्यवहार ठरविला आहे. त्या व्यवहाराची जाहीर नोटिस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-टाकीगाव, ता.उरण, जि.रायगड**

| क्र. | मौजे | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | टाकीगाव | १०/२ | ०.९४.१०<br>पो.ख. ०.०६.३०<br>एकूण १.००.४० | ९.८७ |

श्री. नामदेव जोमा नारंगीकर यांच्या मालकीचे, हिश्याचे व ताबेकब्जाचे ०.१०.०० (१० गुंठे) एवढे अविभाज्य क्षेत्र.

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीच्या व ताबे कब्जाच्या आहेत. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनेंस मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदरहू मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

उरण
दि.११/१२/२०२५

सही/-
**ॲड.धिरज लहू डाकी**
**रा.बोरखार, पो.दिघोडे, ता.उरण,**
**जि.रायगड, पिनकोड-४१०२०६**
**मो.नं.८१०८५४९१८३**

अर्जदाराचे वकील ॲड. कुंदन ना मुंबईकर

## जाहीर नोटीस

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.३२०/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०१/२०२६

१) श्री. अनंत काशिनाथ घरत — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील नमुद अर्जदार यांनी कै. नामा धर्मा घरत रा.नविन शेवे ता. उरण जि. रायगड हयांचा वारस मुलगा कै काशिनाथ नामा घरत रा. नवीन शेवे ता.उरण जि. रायगड यांचा वारस दाखला मिळणेकरीता सदरचा दिवाणी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. कै नामा धर्मा घरत हयांचा मृत्यु दिनांक ०८/१०/१९७५ रोजी झाला. तर त्यांचा मुलगा कै काशिनाथ नामा घरत हयांचा मृत्यु दिनांक १७/११/२०१९ रोजी झाला कै काशिनाथ नामा घरत हयांची पत्नी कै लिला उर्फ लिलाबाई काशिनाथ घरत हयांचा मृत्यु ०९/०९/२००७ रोजी झाला. कै. नामा धर्मा घरत यांचे मालकीची ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे शेवे ता. उरण जि. रायगड येथे मिळकत होती व आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| क्रं. | मौजे | यु.के.नं. | स.नं | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेवे | १८९ | ४३ | २१ | ०-०६-०० |

वरील नमुद मिळकत ही शासनाकरीता सिडकोमार्फत संपादीत करण्यात आली आहे. सदर मिळकतीच्या बाबतीत जाहीर होणारे १२.५ टक्के विकसीत भुखंडहे अर्जदार याच्या नावे जाहिर होणार आहेत. व त्याकरीता अर्जदार यांनी कै नामा धर्मा पाटील हयांचा वारस मुलगा कै काशिनाथ नामा पाटील हयांचे हिस्सापुरता यांचा वारस दाखला मिळणेकरीता सदरचा चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदर चौकशी अर्जाच्या कामी अर्जदार यांनी केलेल्या मागणीबाबत जर कोणाला हरकत घ्यायची असेल तर ती त्याने सदरची नोटीस जाहिर झाल्यापासुन १ महिन्याच्या आत उरण येथील सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन यांचे कोर्टात घेण्याची आहे. १ महिन्यानंतर आलेल्या हरकतीला फेटाळण्यात येईल याची तमाम जनतेने दखल घ्यावी.

**सही/-** **क.लिपीक** **उरण कोर्ट दि.न्याया.**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-** **सहा.अधिक्षक** **उरण कोर्ट दि.न्याया.**

मा.हंगरगेकर साहेब यांच्या कोर्टात
ॲड.उमेश पंडित राठोड
मो.नं.९०२२१६५००८

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (व) स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१२८१/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०१/२०२६

श्रीमती. काकोली सुबल चंद्र हनरा व इतर १ — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीदवारे सर्व जनतेस कळविणेत येत आहे की, वरील अर्जदार यांचे पती कै. सुबल चंद्र सिबाप्रसाद हनरा यांचा मृत्यू दिनांक- ०३/०३/२०२२ रोजी राहत्या घरी, फ्लॅट क्रं. १ बिल्डींग क्रं. सी/१२ केंद्रिय विहार ६, को. ओ. हौ., सेक्टर ११, प्लॉट नं. ६९, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड पिन ४१०२१० येथे राहत्या घरी मृत्यू झाला आहे. अर्जदार हे यांचे कायदेशीर वारस आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

१. फ्लॅट क्रं. १२ बिल्डिंग क्रं. ए-१४, केंद्रिय विहार २, को. ओ. हौ. सो., सेक्टर ११, प्लॉट नं.६९. खारघर, ता. पनवेल, जि.रायगड पिन ४१०२१०.
(सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम...........)

२. फ्लॅट क्रं. ०१ बिल्डिंग क्रं. सी-१२, केंद्रिय विहार ६, को. ओ. हौ. सो., सेक्टर ११, प्लॉट नं. ६९ खारघर, ता. पनवेल, जि. रायगड पिन ४१०२१०.
( सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम...........)
( सदर दोन्ही मिळकतींचे बाजार मुल्य रक्कम...........)

येणेप्रमाणे सदनिका ही मिळकतीचे वर्णन असून सदरहू सदनिकेचे अनुषंगाने वारस दाखला मिळणे करीता अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै. सुबल चंद्र सिबाप्रसाद हनरा वारस नाहीत असे अगर यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहित धरून मे. न्यायालय अर्जदार यांस वारस दाखल प्रदान करील व मुदतीनंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०८ माहे डिसेंबर सन २०२९ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्याया., पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया., पनवेल**

Hon'ble Judge- Vaishali R. Hangarekar Madam
Adv. Ratan Upadhyay

**PUBLIC NOTICE**
**IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL AT PANVEL**

Misc. Application No. 1547 Of 2025
Exh No.11/D
N.D. 02/02/2026

1. Mrs. Farhat Gulam Mohammed Shaikh, Age 59 years, Indian Inhabitant, Occupation- Housewife, Residing at- Flat No.802, Dheeraj Devika, Apartment, Hill Road, Opposite Police Station, Bandra (W) Greater Mumbai, Maharashtra- 400050.
2. Mrs. Farheen Gulam Mohammed Shaikh, Age- 38 years, Occupation Homemaker An Indian inhabitant having address at-Residing at- Flat No.802, Dheeraj Devika, Apartment, Hill Road, Opposite Police Station, Bandra (W) Greater Mumbai, Maharashtra- 400050.
3. Mr. Mohammed Anas Gulam Mohd Shaikh, Age- 38 years, Occupation Self-employed An Indian inhabitant having address at-Residing at- Flat No.802, Dheeraj Devika, Apartment, Hill Road, Opposite Police Station, Bandra (W) Greater Mumbai, Maharashtra-400050.
4 . Mrs. Mariyam Shaikh, Age- 34 years, Indian Inhabitant, Occupation Homemaker, Residing at Adnan Karim, 7 Myflower, Carmicheal Road, Mumbai-400026
5. Mr. Umer Shaikh, Age-29 years, Occupation Self-employed An Indian inhabitant having address at-Residing at- Flat No.802, Dheeraj Devika, Apartment, Hill Road, Opposite Police Station, Bandra (W) Greater Mumbai, Maharashtra- 400050. — Applicants

NOTICE is hereby given that all the Applicants legal heir of the Late Mr. Gulam Mohammed Shaikh, residing as mentioned in the cause title, deceased died on 21st December 2023, at residential address Flat No.802, Dheeraj Devika, Apartment, Hill Road, Opposite Police Station, Bandra (W) Greater Mumbai, Maharashtra- 400050. The above Applicants have filed an Application for obtaining Heirship Certificate of the estate of the Deceased being the immovable property mentioned in the Schedule below.

This is to give notice to all persons who may dispute the right of the Applicants as the legal heirs of the estate below of Late Mr. Gulam Mohammed Shaikh, to appear in the Court of the Civil Judge (Senior Division) Panvel Hon'ble Judge-Vaishali R. Hangarekar within one month from the date of publication of this Public Notice, to enter their objections; and it is hereby declared that if no sufficient objection is offered on or before the expiration of the above period of one month, the said Hon'ble Judge will forthwith proceed to receive proof of the Applicants' right, and to grant them provided they shall appear entitled thereto a Heirship Certificate, of the estate below of the Late MR. GULAM MOHAMMED SHAIKH,

**THE SCHEDULE ABOVE REFERRED PROPERTY**

| Sr. No. | DISCERPTION OF PROPERTY |
|---|---|
| 1 | Land having Survey / Gat No.35, Hissa No. 4, Area H.R.P 0-35-7 lying and being situated at Village Devichapada, Tal Panvel, Raigad Maharashtra. |
| 2 | Land having Survey/Gat No.35, Hissa No.5, Area H.R.P 0-28-6 lying and being situated at Village Devichapada, Tal- Panvel, Raigad Maharashtra. |
| 3 | Flat No.802, Dheeraj Devika, Apartment, Hill Road, Opposite Police Station, Bandra (W) Greater Mumbai, Maharashtra-400050. |
| 4 | By way of Registered Deed of Allotment cum confirmation Crescent Business Square, Shop No. 4,5,6, Ground Floor, Office Unit 601, to 612, 6th Floor, office Unit No.701 to 704 & 707 to 710, 7th Floor, Parking No. 69, Having CTS No. 182/6A/1) lying and being situate at Village- Saki, Taluka-Kurla, Mumbai. |

Dated this 9 day of 12/2025

**Court Seal**

**SD/-**
**Asst.Supted.,**
**CJSD, Panvel**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# ध्वज दिनी निधी संकलन हे मोठे देशकार्य : जिल्हाधिकारी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी सैनिक कायम कार्यरत असतात. या सैनिकांच्या मदतीसाठी ध्वज दिन निधी संकलन करणे हे एक मोठे देशकार्य आहे. त्यामुळे हे देशकार्य जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचून सैनिकांसाठी भरघोस निधी जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालययातील राजस्व सभागृह येथे आज यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ-२०२५ करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, अपर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड सुनिल इंदलकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कर्नल राहुल माने (निवृत) आदि उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, १९४९ पासून, ७ डिसेंबर हा दिवस देशभरात सशस्त्र सेना ध्वज दिन म्हणून साजरा केला जातो. शहीद आणि गणवेशधारी सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी, ज्यांनी देशाच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी आपल्या सीमेवर शौर्याने लढा दिला आणि लढत राहिले, त्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. सैनिक हे कोणत्याही देशाच्या सर्वात मोठ्या संपत्तीपैकी एक असतात. ते राष्ट्राचे रक्षक असतात आणि कोणत्याही परिस्थितीत नागरिकांचे रक्षण करतात. आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी, सैनिकांनी त्यांच्या आयुष्यात खूप काही बलिदान दिले आहे. मातृभूमीच्या सेवेत आपले प्राण अर्पण करणाऱ्या या शूर वीरांचा देश कायम ऋणी आहे.

आपले कर्तव्य आहे की, आपण केवळ कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या शहीद आणि जिवंत वीरांबद्दल आदर व्यक्त करू नये तर या बलिद-ानाचा महत्त्वाचा भाग असलेल्या त्यांच्या कुटुंबांबद्दलही आदर व्यक्त करू. केंद्र आणि राज्य पातळीवरील सरकारी उपाययोजनांव्यतिरिक्त, काळजी, आधार, पुनर्वसन आणि आर्थिक मदत देण्यासाठी आपले/तिचे निःस्वार्थ आणि स्वेच्छेने योगदान देणे, हे आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचे सामूहिक कर्तव्य आहे. ध्वज दिन आपल्या युद्धात अपंग असलेल्या सैनिकांची, वीर नारींची आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शहिदांच्या कुटुंबांची काळजी घेण्याची आपली वचनबद्धता आपण पूर्ण करायला हवी. भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहूती देऊन सर्वोच्च बलिदान दिले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी तसेच युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा वापर केला जातो. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली आणि ध्वजदिन निधीत सहभाग देणाऱ्यांकडून निधी संकलित करण्यात आला. यावेळी शासकीय कर्मचारी निवृत्त जवान उपस्थित होते.

# कमी पटसंख्याअसलेल्या शाळा बंद करू नये याकरिता सर्वोदय संघटनेकडून ११ जानेवारीला प्रांत कार्यालयावर मोर्चा

**दै.रायगड नगरी । दिपक लोके**

**पेण ।** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात ५० शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे मुंगोशी, कुरनाड, आनंदनगर, काळेश्री, कुहिरे आणि पाहीरमाळ सहा जिल्हा परिषद शाळांना सरकारने शिक्षक दिलेले नाहीत तसेच रोडे जिल्हा परिषद शाळा पहिली ते सातवीपर्यंत असून पटसंख्या १०६ आहे पण या शाळेला फक्त तीन शिक्षक दिलेले आहेत त्यामुळे पहिली ते सातवी वर्गातील १०६ मुलांना तीन शिक्षक शिकवणार कसे? तसेच वढाव, वडखळ, जावळीसह अशा अनेक शाळांची ही अवस्था आहे जिथे पटसंख्या असूनही शिक्षकांची संख्या अपुरी आहे. सरकारने ७ ऑक्टोबर २०२५ रोजी एक ते पाच पटसंख्याच्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पेण तालुक्यातील वरप, झापडी, गौळावाडीसह २९ शाळा बंद होणार आहेत त्यामुळे गरिबांची मुले शिकणार कशी? अशा विविध मागण्यांसाठी ११ जानेवारीला प्रात कार्यालया समोर आंदोलन करणार असल्याचे निवेदन सत्यशोधक सर्वोदय संघटनेकडून तसे प्रांत अधिकारी यांना देण्यात आले आहे

महाविद्यालयाला प्राध्यापक नाही, आश्रम शाळेतला शिक्षक नाही, परझड झालेल्या शाळा, शौचालय नाही, स्वच्छता गृह नाही, अपुरे शिक्षक, विज नाही, शाळेला कॉम्प्युटर नाही, बेंचेस नाही, शुद्ध पाणी नाही, ढासळलेली शैक्षणिक गुणवत्ता अशा परिस्थितीमध्ये सरकारी शाळा आहेत. शिक्षणाच्या खाजगी कारणामुळे आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मुळे रायगड जिल्ह्यातील ३०० पेक्षा अधिक शाळा बंद असून महाराष्ट्रातील सुमारे १० हजार पेक्षा शाळा बंद झालेल्या आहेत. शिक्षणाच्या खाजगीकारणामुळे पहिली आणि दुसरीच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च ३५ ते ४० हजार रुपये, अकरावी बारावीचा खर्च २ ते ३ लाख रुपये, एमबीएचा खर्च ५ ते ७ लाख रुपये, इंजिनिअरिंगचा खर्च १५ ते १७ लाख रुपये आणि डॉक्टर होण्यासाठी खर्च ७० ते ८० लाख रुपये येत आहे. त्यामुळे गरिबांची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकली गेलेली आहेत.

अंगणवाडी ते पदव्युत्तर डॉक्टर इंजिनियर होईपर्यंत मोफत शिक्षण मिळावे, शिक्षक आणि प्राध्यापकांची भरती करावी, संच मान्यता जीआर रद्द करावे, शाळा बंद करू नये अशा अनेक मागण्या घेऊन शिक्षक, विद्यार्थी, पालक यांचा ११ डिसेंबर २०२५ रोजी उपविभागीय कार्यालयात पेण येथे मोर्चा काढून शिक्षण हक्क सत्याग्रह करणार असल्याचे निवेदन प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांना निवेदन देण्यात येणार आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र / करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा/वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा/वाटपपत्र संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | |
| १ | द्रोणागिरी २२५४ | जासई ११/९० | ७२/२ | ०-३२-३ | ५०० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी, सेक्टर-४७, भूखंड क्र.५५A, क्षेत्र-४९९.९५ चौ.मी. | **कै. यमुना चंदर फडके मयत यांचे वारस**<br>१) श्री. नामदेव कान्हा ठाकूर<br>२) श्री. दिनानाथ कान्हा ठाकूर<br>३) श्री. अरूण कान्हा ठाकूर<br>४) श्री. नरेंद्र कान्हा ठाकूर<br>५) श्री. रंजन कान्हा ठाकूर | निरंक |
| | | जासई १८/९५ | १४८/२अ | ०-२२-३ | | | | |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **०-५४-६** | | | | |
| २ | खारघर २१४ | ६९ | ३७८/२ | ०-०९-० | एकुण ८४५० चौ.मी. मधील २४०० चौ.मी. पैकी ४०० चौ.मी. | भूखंड क्र.५५, सेक्टर-३५D, क्षेत्र-४०० चौ.मी. | **१) कै. मैनुद्दीन अब्दुला पटेल (मयत)** यांचे वारस<br>१.१. अब्दुल वहाब मैनुद्दीन पटेल (मयत) यांचे वारस १.१.१) बदुन्नीसा अ. वहाब पटेल<br>१.१.२) हालीबीबी अ.वहाब पटेल उर्फ हालिमाबी दस्तगीर पटेल<br>१.१.३) झरीना अ. वहाब पटेल उर्फ जरीना जहीर पटेल १.१.४) शबाना अ. वहाब पटेल उर्फ शबाना मुनाफ फक्की<br>१.१.५) झकरीया अ. वहाब पटेल<br>१.१.६) जहीर अहमद अ. वहाब पटेल<br>१.१.७)फातिमा अ. वहाब उर्फ फातिमा नुर पटेल<br>१.१.८) मिजबा अ.वहाब पटेल उर्फ मिजबा दस्तगीर १.१.९) आजमा अ. वहाब पटेल उर्फ अजमा अजहर पटेल<br>२. अब्दुल रहीम मैनुद्दीन पटेल<br>३. अब्दुल रऊफ मैनुद्दीन पटेल<br>४. जैतुनबीबी इक्बाल पटेल | मा. दिवाणी न्यायालय न्यायाधीश, व. स्तर पनवेल यांजकडे दाखल दिवाणी दावा क्र. एस.सी.एस. ४१८/२०१५ मध्ये निशाणी क्र. ५ मधील अर्ज मंजुर करताना तात्पुरत्या पारीत मनाईहुकूमाच्या आदेशास अधिन राहून खारघर नोड येथील इरादित भुखंड क्र.५५, सेक्टर-३५D, क्षेत्र-४०० चौ.मी. भूखंडाचे वाटपपत्र व भाडेपट्टा करारनामा करण्यास प्रस्तावित आहे. |
| ३ | | ७० | ३७९/६A | ५-१५-० | | | | |
| ४ | | ७० | २९०/१<br>२९१/४<br>२९३/१क<br>२९३/१ई | २-७३-०<br>०-६७-८<br>०-१०-०<br>०-०१-० | | | | |
| | | एकुण क्षेत्र | | ३-५१-८ | | | | |
| ५ | | ६९ | २९१/१<br>३०३/३ | ०-२७-३<br>०-५२-० | | | | |
| | | एकुण क्षेत्र | | ०-७९-३ | | | | |
| | | ६९ | ४२/१ | ०-१३-० | | | | |
| | | एकुण क्षेत्र | | **९-८६-१** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,
सिडको भवन,समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल/उरण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/४१७/२०२५-२६**

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

ई-निविदा सूचना क्र : पमपा/सा.बां. (श.अ.) / ५५२५/प्र.क्र.०३/२१२२/२०२५ दिनांक: १०/१२/२०२५

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबंधितांकडून मागविण्यात येत आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) या योजनेअंतर्गत कामे

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१५ येथील पीएल-५, बिल्डींग नं.१ ते १०, सेक्टर-१० खांदा कॉलनी जीवनसागर सहकार गृहनिर्माण संस्थेसमोरील रस्ता तयार करणे. | PMC/PWD (C.E./ 17/2025 | १४,६४,६७३/- | १५,०००/- | ६ महिने |
| २ | प्रभाग क्र.०३ पेंधर एम.आय.डी.सी. मेन रोड ते विठठलमंदिर रेल्वे कडून येणा-या पुलापासून जिल्हा परिषद मराठी शाळेपर्यंत रस्ता तयार करणे. | PMC/PWD (C.E./ 20/2025 | ३३,६७,४०७/- | ३४,०००/- | ६ महिने |
| ३ | प्रभाग क्र.०३ पेंधर गावातील मुख्य रस्ता ते श्रीपत पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे, | PMC/PWD (C.E./ 21/2025 | ३१,४२,७४७/- | ३२,०००/- | ६ महिने |
| ४ | प्रभाग क्र.०३ पेंधर गावातील शिव मंदिरा शेजारील रस्त्याचे काम करणे, | PMC/PWD (C.E./ 22/2025 | २७,९५,६९८/- | २८,०००/- | ६ महिने |
| ५ | प्रभाग क्र. ०३ पेंधर गावातील संतोष पाटील यांच्या घरापासून ते सुनिल पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता व गटार तयार करणे, | PMC/PWD (C.E./ 23/2025 | १२,३०,८२८/- | १२,५००/- | ६ महिने |
| ६ | प्रभाग क्र.०३ पेंधर गावातील अनिल नाईक यांच्या घरापासून ते नामदेव बुवा यांच्या घरापर्यंत रस्ता व गटार तयार करणे. | PMC/PWD (C.E./ 24/2025 | ३९,३७,४४०/- | ४०,०००/- | ६ महिने |
| ७ | प्रभाग क्र.०३ पेंधर गावातील प्रकाश भोईर यांच्या घरापासून ते मुख्य रस्ता तयार करणे. | PMC/PWD (C.E./ 25/2025 | १२,१०,०२०/- | १२,५००/- | ६ महिने |
| ८ | प्रभाग क्र.०३ पेंधर गावातील गोपाळ भंडारी यांच्या घराशेजारील रस्ता तयार करणे. | PMC/PWD (C.E./ 26/2025 | ४०,५९,७३५/- | ४१,०००/- | ६ महिने |
| ९ | प्रभाग क्र.०३ पेंधर गावातील राजाराम पाटील यांच्या घरापासून ते संदिप पाटील यांच्या घरापर्यंत काँक्रीटीकरण करणे. | PMC/PWD (C.E./ 27/2025 | १५,०६,७०३/- | १५,१००/- | ६ महिने |
| १० | प्रभाग क्र.०३ पापडीचा पाडा प्रल्हाद मधुकर पाटील याच्या घरापासून त भरत पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | PMC/PWD (C.E./ 28/2025 | २४,४२,७३३/- | २५,०००/- | ६ महिने |
| ११ | प्रभाग क्र.०३ पापडीचा पाडा गावातील वसंत घरत यांच्या घरापासून ते रविंद्र घरत यांच्या घरापर्यंत गटार व रस्ता काँक्रीटीकरण करणे. | PMC/PWD (C.E./ 29/2025 | ३५,३८,२८०/- | ३५,५००/- | ६ महिने |
| १२ | प्रभाग क्र.०३ पापडीचा पाडा गावातील साईबाबा मंदिर ते आर.ए.एफ. बस स्टॉप रस्ता काँक्रीटीकरण करणे व गटार बांधणे. | PMC/PWD (C.E./ 30/2025 | २६,१८,७१६/- | २६,५००/- | ६ महिने |
| १३ | प्रभाग क्र.०३ पापडीचा पाडा गावातील कैलास घरत यांच्या घरापासून ते रामदास घरत यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे व गटार बांधणे. | PMC/PWD (C.E./31/2025 | ३४,४६,९४०/- | ३५,०००/- | ६ महिने |
| १४ | प्रभाग क्र.०३ पापडीचा पाडा गावातील आदिवासी वाडी ते शिव मंदिर दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे. | PMC/PWD (C.E./ 32/2025 | ३५,०२,८३३/- | ३६,०००/- | ६ महिने |
| १५ | प्रभाग क्र.०३ पापडीचा पाडा गावातील रामदास पाटील यांच्या घरापासून ते गणेश पाटील यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | PMC/PWD (C.E./ 33/2025 | २३,७८,८१८/- | २४,०००/- | ६ महिने |
| १६ | प्रभाग क्र.१५ खांदा कॉलनी सेक्टर-१२ बालभारतीच्या बाजूची संरक्षण भिंत नव्याने बांधणे. | PMC/PWD (C.E./34/2025 | ३८,१४,७०५/- | ३९,०००/- | ६ महिने |
| १७ | प्रभाग क्र.१६ सेक्टर-५ पार्श्व ज्योत को हाउसिंग सोसायटी शिवमंदिर येथे सेक्टर-६ येथील नाल्यावर लोखंडी पादचारी पूल बांधणे. | PMC/PWD (C.E./35/2025 | २९,९८,३४४/- | ३०,०००/- | ६ महिने |
| १८ | प्रभाग क्र.१८ ओझा हॉस्पिटल ते मुजावर बंगला पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे, | PMC/PWD (C.E./36/2025 | १४,३७,५३९/- | १५,०००/- | ६ महिने |

उपरोक्त कामांच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १२/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त-१,**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

# निविदेत घोळ; सोयीनुसार अटी व शर्ती? निविदा प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात

**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** डिजिटल इंडिया मोहिमेंतर्गत राज्यातील जास्तीत जास्त कामकाज ई-गव्हर्नन्स पद्धतीने व्हावे व निविदा प्रक्रिया ही ई-निविदा प्रक्रियेने असावी, अशी सरकारची रोखठोक भूमिका आहे. निविदा प्रक्रियेत होणाऱ्या भ्रष्टाचारावर लगाम आणि कामकाजात पारदर्शकता आणू पाहणाऱ्या सरकारच्या या धोरणाला रायगड जिल्ह्यातील खारभूमी विकास मंडळाकडून सुरुंग लावण्यात आल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरु आहे.

खारभूमी विकास मंडळाकडून धेरंड खारभूमी योजनेच्या नूतनीकरणासाठी ३ कोटी ५३ लाख ३५ हजार ६६९ रुपयांच्या कामाची निविदा काढण्यात आली. कंत्राटदाराला निविदा भरण्यासाठी विभागाकडून २२ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०२५ पर्यंतचा म्हणजेच केवळ सात दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. या प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कंत्राटदार संस्थांना या कालावधीतच ऑनलाईन पद्धतीने अर्ज करायचे होते. यानंतर १ ऑक्टोबर रोजी ही निविदा उघडण्यात आली.

जाहीर केलेल्या या ऑनलाईन प्रक्रियेत चार कंत्राटदार संस्थांनी भाग घेतला होता. या निविदा प्रक्रियेत प्रिमिअर सिव्हिल कंपनी प्रा.लि. या कंपनीला पात्र ठरविण्यात आले, तर अन्य शशांक आत्माराम सावंतदेसाई, श्रेयस सुधाकर म्हात्रे, डी. के. कन्स्ट्रक्शन या तीन कंपन्यांना अपात्र ठरविण्यात आले. नियमानुसार, एकाच एल-१ मध्ये जाण्यासाठी एकाच कंपनीला पात्र ठरविता येत नाही. मात्र या निविदेत केवळ एकाच कंपनीला पात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे केवळ मर्जीतील ठेकेदाराला काम मिळविण्यासाठी खारभूमी विभागाने ही निविदा प्रक्रिया राबविल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. साडेतीन कोटी रुपये खर्चाचे हे काम एका कंपनीच्या घशात घालण्यासाठी खारभूमी विभागाने या प्रक्रियेत घोळ केला. त्यामुळे हे टेंडर आणि काम वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

निविदा प्रक्रिया पूर्ण न होता, आर्थिक निविदा उघडण्यात आली. शासनाचे नियम धाब्यावर बसवत मर्जीतील ठेकेदाराला ठेका देण्याचा प्रताप या विभागाकडून करण्यात आला आहे. प्रत्यक्षात चार जणांनी या प्रकल्पाच्या कामासाठी निविदा भरल्या होत्या. नियमाप्रमाणे तीन पात्र झाल्यावरच आर्थिक निविदा उघडणे गरजेचे होते. परंतु, त्या पद्धतीने संबंधित विभागाने न करता, तीन अपात्र ठरवूनदेखील निविदा उघडण्यात आल्याचा आरोप होत आहे.

धेरंड येथील साडेतीन कोटींचे हे काम ठराविक एकाच कंपनीला मिळावे म्हणून अधिकाऱ्यांनी निविदा प्रक्रियेमध्ये शॉर्टकट मारला आहे. त्यामुळे टेंडरमध्ये गैरव्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळे हा घोटाळा झाल्याचा संशय आहे. त्यामुळे या टेंडर घोटाळ्याची उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

# नवीन पाणीपुरवठा योजनेच्या कामाला घाई नको; रस्ते टिकवूनच योजना पूर्णत्वास यावी : जनमत

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर**

**उतेखोल/माणगाव ।** माणगांव शहरासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मंजुरीने राबविण्यात येणाऱ्या 'अमृत पाणीपुरवठा योजने'अंतर्गत सुरू असलेली नवीन पाइपलाइन व जलशुद्धीकरण यंत्रणेची कामे सध्या वेगाने सुरू आहेत. शहरातील वाढती लोकसंख्या आणि विस्तारणाऱ्या वसाहती लक्षात घेता भविष्यातील २४ तास शुद्ध पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. योजनेत विद्यमान फिल्टर प्लांटचे अद्ययावत नुतनीकरण, नवीन टाक्या, एमबीआर जलकुंभ उभारणी तसेच संपूर्ण शहरात बिडा (कास्ट आयर्न) ऐवजी एसडीपी पाइपलाइन बसविण्याचे काम करण्यात येत आहे.

मात्र या कामासाठी शहरातील अनेक रस्ते नव्याने खोदण्याची आवश्यकता निर्माण होत असल्याने दळणवळणात अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मागील काही वर्षांत मोठ्या प्रयत्नांनंतर शहरातील मुख्य व अंतर्गत रस्ते सुधारले गेले होते. मात्र सध्याच्या परिस्थितीमध्ये अनेक रस्त्यांची अवस्था पुन्हा खराब दिसून येत आहे. वाढती रहदारी आणि वाहनतळांमुळे कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. त्यातच नवीन पाइपलाइन खोदकामामुळे रस्त्यांची आणखी हानी होऊ नये, अशी नागरिकांची मागणी आहे.



नागरिकांचे मत आहे की, जिथे शक्य असेल तिथे रस्त्याच्या एका बाजूने खोदकाम करावे, जेणेकरून रस्ते पूर्णपणे अडथळ्यांत येणार नाहीत. मध्यभागी केलेले अर्धवट खोदकाम वाहतुकीसाठी अडथळा ठरण्यासोबतच पुढील काळात रस्त्यांचे पुनर्निर्माण कठीण होईल, भविष्यात नवीन पाईप लाईन देखील नादुरुस्त होऊ शकते, मग पुन्हा रस्ते खोदून त्यांची अवस्था बिकटच होईल! अशी भीती व्यक्त होत आहे. काही नागरिकांनी हेही मत नोंदवले की, ठेकेदार खोदकाम करून माती टाकून काम उरकून जातील व त्यानंतर रस्ते पूर्ववत करणे अवघड होईल.

सध्या विद्यमान पाणीपुरवठा योजना जुन्या जनगणनेनुसार काही तांत्रिक अडचणी वगळता सुरळीत कार्यरत आहे. त्यामुळेच नवीन योजनेच्या कामात कोणतीही अनाठायी घाई नको, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. नवीन एमबीआर टाकी, जलकुंभ आणि मुख्य पाइपलाइनचे काम पूर्ण झाल्यानंतरच जोड पाइपलाइनचे काम टप्प्याटप्प्याने करावे, अशी मागणी नागरिक मांडत आहेत.

ही योजना कोणत्याही राजकीय प्रेरणेतून नव्हे तर शहराच्या दूरगामी हितासाठी निर्हेतुकपणे पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा माणगांवकरांनी व्यक्त केली आहे. पुढील वर्षभरात माणगांव नगरपंचायत निवडणुका होणार असल्याने हा मुद्दा संवेदनशील बनला आहे. त्यामुळे नगराध्यक्ष, पाणी सभापती, नगरसेवक, मुख्याधिकारी, कनिष्ठ अभियंता तसेच ठेकेदार यांनी या योजनेबाबत सतर्क राहून नियोजनबद्ध कार्यवाही करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

जुन्या पाणीपुरवठा योजनेमुळेच शहराचा विकास जलदगतीने होऊ शकला आणि वाढत्या वसाहतींमध्येही पाण्याची उपलब्धता राहिली, हे नागरिकांच्या स्मरणात आहे. भविष्यातील २४ तास शुद्ध पाणीपुरवठा, वाढत्या पाणीपट्टीचे भान आणि शहरातील रस्ते सुस्थितीत राखणे - या सर्व बाबी लक्षात घेऊनच काम व्हावे, असे जनमत उमटत आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या शुभहस्ते मराठा भवन कार्यालयाचे भव्य उद्घाटन आणि मराठा कृतज्ञता मेळावा उत्साहात पार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनी, पनवेल यांच्या वतीने नव्याने सजविण्यात आलेल्या मराठा भवन कार्यालयाचे उद्घाटन संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या उद्घाटन सोबतच मराठा कृतज्ञता मेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मनोज दादांच्या मुंबईतील दोन्ही आंदोलनांदरम्यान महाराष्ट्रभरातून आलेल्या मराठा बांधवांची सेवा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सेवाभावी संस्था, स्वयंसेवक व मराठा बांधवांचा सन्मान करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी मार्गदर्शन करताना मराठा समाजाने एकदिलाने संघटित राहून न्यायाच्या लढ्यात कायम उभे राहणे अत्यंत गरजेचे आहे.

आपल्याला मिळणाऱ्या अधिकारांसाठी संघर्ष थांबणार नाही, तो शेवटपर्यंत सुरूच राहील.शिक्षण, रोजगार, व सामाजिक एकजूट हीच खरी ताकद आहे. मराठा समाजातील प्रत्येक तरुणाने स्वतःवर विश्वास ठेवून पुढे यायला हवे. या कार्यक्रमामध्ये सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनीच्या वतीने मनोज दादा जरांगे पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. समाजातील अनेक मान्यवर मराठा समाज बांधव,विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सकल मराठा समाज मंडळ खांदाकॉलनी चे अध्यक्ष संतोष जाधव, सचिव सदानंद शिर्के, रायगड जिल्हा समन्व्यक विनोद साबळे, गणेश कडू, रामदास शेवाळे, संस्थेचे इतर पदाधिकारी, सदस्य व प्रत्येक विभागातील सर्व समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

### महापालिका उभारणार दिव्यांग वेलनेस सेंटर

# पनवेल महानगरपालिका दिव्यांग व्यक्तींना वैद्यकिय उपचार व पुनर्वसन सेवा देणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना आरोग्य उपचार, समुपदेशन, कौशल्यविकास, थेरपी तसेच पुनर्वसन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक कार्यक्रम राबविण्यासाठी महापालिकेच्यावतीने दिव्यांग व मतिमंद यांच्यासाठी फिजीओथेरपी व मल्टिडिसीप्लनरी थेरपी पुनर्वसन केंद्र अर्थात दिव्यांग वेलनेस सेंटर उभारले जाणार आहे. या दिव्यांग वेलनेस सेंटरच्या माध्यमातून दिव्यांग नागरिकांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पुनर्वसन होऊन त्यांना स्वावलंबी बनण्यास मदत होणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले आहे.

सध्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात अंदाजे १८६८ दिव्यांग नागरिकांची नोंद असून त्यांना वैद्यकीय सेवा, विविध उपचार पद्धती आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना सहज, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे आहे.

याबरोबरच स्वावलंबन व पुनर्वसन प्रक्रियेला गती देणे, व्यावसायिक कौशल्यांद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे हा आहे.

दिव्यांग नागरिकांचे जीवनमान उंचावण्याच्यादृष्टीने महापालिकेने हे महत्वाचे पाऊल उचलले असल्याचे दिव्यांग विभागाचे उपायुक्त रवीकिरण घोडके यांनी सांगितले आहे.

# बिबट्या आलारे आला, उरणकरांनो सावधान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कोप्रोली,पुनाडे मधिल डोंगर परिसरातील आदिवासी नागरी वस्तीत मंगळवारी (दि९) रात्रीच्या अंधारात बिबट्या शिरल्याने एकच खळबळ उडाली आहे. सदर बिबट्यांनी दोन बकऱ्या ,दोन कुत्रे खाऊन टाकली आहेत.सदर बिबट्या शिरल्याच्या बातमीने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभाग, स्थानिक नागरिकांनी आठ तासांपासून प्रयत्न सुरू आहेत. मात्र अद्याप बिबट्याला जेरबंद करण्यात आलेले नाही. त्यामुळे बिबट्या आलारे आला तरी उरणकरांनो सावधान अशी परिस्थिती उरण तालुक्यात निर्माण झाली आहे.

मंगळवारी रात्रीच्या सुमारास पुनाडे, कोप्रोली मध्ये बिबट्या शिरल्याचे कळताच नागरिकांमध्ये एकच धावपळ माजली आणि भीतीचे वातावरण पसरले. अनेकांनी घराची दारे-खिडक्या बंद करुन घरात राहणे सुरक्षित समजले. तर, काहींनी बिबट्याला पाहण्यासाठी घटनास्थळी धाव घेतल्याचे दिसून आले. घटनास्थळी वनविभाग आणि भाजपचे उरण पुर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, आदिवासी बांधव, परिसरातील नागरिकांनी धाव घेतली आहे. सदर बिबट्यांनी दोन बकऱ्या दोन कुत्रे खाऊन टाकल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्याला जेरबंद करण्यासाठी वन विभागाकडून वारंवार सूचना देण्यात येत आहेत. बिबट्याला जेरबंद करण्याचे प्रयत्न अजूनही सुरूच आहेत. तरी उरणकरांनो सावधान उरणात बिबट्या आला आहे. नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन वन विभागाकडून करण्यात येत आहे.




# आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मा.मुख्य न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या सहमतीनुसार व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग तसेच अलिबाग जिल्हा कारागृह, वर्ग-२,अलिबाग यांच्या समन्वयाने अलिबाग जिल्हा कारागृह येथे आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कारागृहातील बंद्यांच्या मानवी हक्क व संरक्षणाबाबत जागृती करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस ड.मानसी म्हात्रे, जेष्ठ विधिज्ञ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दरवर्षी १० डिसेंबर रोजी जगभर मानवाधिकार दिन साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश बंद्यांचे मुलभूत अधिकार व त्याबद्दल बंद्यामध्ये जागरुकता निर्माण करुन बंद्यांना समान प्रतिष्ठा व बंद्यांच्या हक्काबाबत तसेच बंद्यांनी मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास तक्रार कोठे व कशी करावयाची तसेच तक्रार करताना कोणती दक्षता घ्यायची याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच वरिष्ठ दिवाणी न्यायाधिश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,रायगड-अलिबाग श्रीमती तेजस्विनी निराळे, यांनी मानवाधिकारांचे रक्षण करणे तसेच तुरुंगामध्ये येणाऱ्या अडचणींवर मात कशी करावी तसेच बंद्यांना आपल्या हक्काची जाणीव करुन देवून समानतेच्या वागणुकी विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमावेळी पुरुष व महिला बंद्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून या कार्यक्रमाकरीता १७३ महिला व पुरुष बंदी उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे मानवी हक्कांबाबत जागृती होण्यास निश्चितच मदत होईल.

हा कार्यक्रम अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे वारके (भा.पो.से) व विषेश पोलीस महानिरीक्षक, कारागृह (दक्षिण विभाग) भायखळा योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांचे स्वागत अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह यांच्यामार्फत करुन करण्यात आली. या कार्यक्रमाकरीता अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह विशाल बांदल, ॲड.ए.डी.पाटील (उपाध्यक्ष ), ॲड.अमित देशमुख (सचिव) ॲड.राजेंद्र माळी (खजिनदार) वकील बार असोशिएशन,अलिबाग तसेच ॲड.शेखर कामथे, मुख्य लोक अभिरक्षक, ॲड.निलोफर शेख, ॲड.तन्मय म्हात्रे, सहाय्यक लोक अभिरक्षक, श्रीम.नितल म्हात्रे, लिपिक जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, अलिबाग-रायगड, ॲड.विकास पाटील, ॲड. हिना तांडेल, पॅनेल विधिज्ञ, ॲड. आदित्य कांबळे, ॲड. पुनम राजंणकर, विधी स्वयंसेवक तसेच अलिबाग जिल्हा कारागृहातील अधिकारी किशोर वारगे, तु.अ.श्रेणी-२, श्री.कुटे, सुभेदार व तसेच श्री. वाणी, श्री.वाघमारे का. शिपाई इत्यादी उपस्थित होते.

## मिरची गल्ली मध्ये अर्थवट बांधकाम स्थितीत असलेल्या इमारतीला लागली आग



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील मिरची गल्ली येथील एका अर्थवट बांधकाम स्थितीत असलेल्या इमारतीला आग लागल्याची घटना आज घडली आहे.

शहरातील मिरची गल्लीच्या प्रवेशद्वाराजवळील आर्किड क्लिनिकच्या बाजूला असलेल्या अर्थवट बांधकाम स्थितीतील इमारतीमध्ये आज दुपारी अचानकपणे आग लागून येथे असलेल्या गवताने व प्लस्टिकने पेट घेतला. याबाबत परिसरातील जागृत नागरिकांना माहिती मिळताच त्यांनी त्वरित येथे जाऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान काहींनी तात्काळ पनवेल अग्निशामक दलाशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानुसार अग्निशामक दल घटनास्थळी दाखल होत त्यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. दरम्यान हा भाग दाटीवाटीच्या असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले असते तर मोठ्या प्रमाणात परिसराचे नुकसान झाले असते. यापूर्वीसुद्धा आ भागात अश्या प्रकारच्या आगीच्या घटना घडल्या आहेत.

# मुरुड आगाराच्या कारभारा बाबत तीव्र नाराजी ; लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । मुरुड**

राज्य परिवहन महामंडळाच्या मुरुड आगाराच्या एस.टी.गाड्या काही ना काही कारणाने रस्त्यावर बंद पडण्याच्या प्रकारात अनेक दिवसांपासून वाढ झाली असल्याचे दिसून येत असून एकंदरीत आगाराच्या कारभारा बाबत प्रवासी व नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून कारभार सुधारणार तरी कधी ? असा सवाल विचारला जात आहे.याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे बोलले जात आहे.

आज बुधवार दि.१० डिसेंबर रोजी मुरुड आगारातून सकाळी ६.०० वा.सुटलेली मुरुड -भांडूप एस टी नांदगाव -दांडा येथे ब्रेक डाऊन झाल्याने सुमारे ४० प्रवाशांचा खोळंबा झाला,दि.४ डिसेंबर रोजी सकाळी कल्याण हून मुरुडला येणारी गाडी काशिद व बारशिव दरम्यान बंद पडली होती,याच दिवशी सकाळी मुरुड हून सकाळी साडेपाच वाजता सुटलेली मुरुड -धुळे गाडी पेण येथे इंधन (डिझेल) कमतरतेमुळे सुमारे सव्वा तास रखडल्याने प्रवासी खोळंबले होते. कारण मुरुड आगाराचे डिझेल पंप गेली सात वर्षे बंद आहे. त्यामुळे अलिबाग व पेण येथील आगारात डिझेल साठी प्रवाशांचा खोळंबा होतो. अशाच प्रकारे रस्त्यावर गाड्या बंद पडण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे प्रवासी वर्गातून नाराजीचा सूर दिसून येत आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वरीष्ठ अधिकारी वर्गाने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष पुरवून येथील प्रवासी वर्गाला एस टी सेवेची उत्तम प्रकारे सुविधा उपलब्ध करून दिलासा द्यावा.अशी मागणी जोर धरीत आहे.